# गेवराई नगरपरिषद

**शास्त्री चौक, गेवराई, ता.गेवराई, जि.बीड**

**(अग्निशमन व आणीबाणी सेवा विभाग)**

ईमेल :- mcgeroai@gmail.com

**जा.क्र.:** 801/2026 **दि:** 20/07/2026

**अग्निशमन बाबतचे नाहरकत प्रमाणपत्र**

**(आग प्रतिबंधक जीवनसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अन्वये)**

प्रति,

**द.केंब्रिज व्हॅली इंटरनॅशनल स्कुल**

**जालना रोड गेवराई ता.गेवराई जि.बीड**

संदर्भ :- 1. आपला अर्ज आवक क्र ४७९१ दि. ०३/०६/२०२६

2. शुल्क भरणा - पावती पुस्तक क्रमांक ५८ पावती क्रमांक 57 दि.17/07/2026

उपरोक्त विषयी आपल्या संदर्भीय विनंती अर्जानुसार आपण द.केंब्रिज व्हॅली इंटरनॅशनल स्कुल, गेवराई ता.गेवराई जि.ब्रीड करीता अग्निशमन बाबतचे नाहरकत प्रमाणपत्र मिळणे बाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

सबब महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ नुसार खालील दिलेल्या अटी व शर्ती च्या अधिन राहुन आपणास सदर प्रमाणपत्र निर्गमित केल्यापासून एक वर्षाच्या अवधी करिता अग्निशमन नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. अटी व शर्ती"

१. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियमातील नियम क्र. ३ नुसार अर्जदाराने (विकासक मालक भोगवटदार किंवा उक्त अभिनामाने बोध करण्यात येईल तो आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना २००६ व राष्ट्रीय इमारत संहिता २००६ आणि त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणे नुसार अंमलबजावणी बंधनकारक राहिल. या कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता संबंधीताने घ्यावी.

२. सदरील अधिनियामातील कलम क्र. ३ मध्ये नुसार अर्जदाराने आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनाचे तरतुद केली आहे याबाबतचे लायसन प्राप्त अभिकरणा कडुन दिलेल्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र व पोट कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे दुरुस्त आणि कार्यक्षम स्थीतीत ठेवल्या बाबतचे विहित नमुन्यात प्रमाणपत्र (ब) मुख्य अग्निशमन अधिकारी याच्याकडे वर्षातुन दोन वेळा (जानेवारी व जुलै या महिन्यामध्ये) सादर करावा.

३. कोणतीही व्यक्ती आपल्या इमारतीत किंवा तिच्या भागात बसविलेले आग प्रतिबंधक उपकरण बिघडविणार नाही, त्यामध्ये फेरबदल करणार नाही. ते काढुन टाकणार नाही किंवा त्याला कोणतेही हाणी व नुकसान पोहचविणार नाही किंवा कोणत्याही व्यक्तीला तसे करणेबाबत चिथावणी देणार नाही.

जा.क्र.: दि:

४. सदर इमारतीत अग्निशमन प्रतिबंधात्मक उपाययोजना सुस्थीतीत असल्यानंतर तसेच यापुर्वी यंत्रणा काही तुटीं आढळल्या बाबत आपणास नोटीस मिळाली नसेल तेव्हा त्याठिकाणी आगीपासुन कुठलीही घटना घडली नसेल तरच हे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

५. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ नुसार लावण्यात येणारी अग्निशमन सेवा फी २ जुन २०२३ च्या जीआर नुसार फी आकारण्यात येते. नजरचुकीने कमी फी लावण्यात आल्यास होणारी फरकाची रक्कम ही नाहरकत प्रमाणपत्र घेते वेळेस भरावी लागेल,

६. तात्पुरत्या नाहरकत प्रमाणपत्र दिलेल्या सर्व अटीच्या पुर्ततेस ग्राह्य धरुन तसेच इतर कुठला ही बदल होणार नाही आणि सदर इमारतीत काही बदल करावायाचे असल्यास खालील स्वाक्षरीतास कळवुन बदल / वांढ करण्यात यावी.

७. संविधानीक तरतुदी मध्ये वारंवार होणाऱ्या बदलास अधिन राहुन अतिरिक्त सुचना करण्याचा अधिकार सदर स्वाक्षरी कर्त्याने राखुन ठेवण्यात आला आहे.

८. सदरील नमुद जागेत स्थेच्या इमारतीत मधील आग विझविण्याची प्राथमिक अग्निशमन यंत्र, नळकांडी साधन सामग्री CO2, D.C.P.A.B.C फायर एस्टींग्बीशर्स, वाळुच्या बादल्या, पाण्याचासाठा, फिक्स फायर फायटींग, प्रेशर पंप इत्यादी ठेवण्याच्या अटीवर शाळा / हॉस्पीटल / औद्योगिक क्षेत्राच्या इमारतीसाठी आग प्रतिबंधक व जीवन संरक्षक उपाययोजना म्हणून नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

(विक्रम पुष्पा मारुती मांडूरके)
**मुख्याधिकारी**
**गेवराई नगरपरिषद**